# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक ३००/२०२४** **दिनांक- १४/०८/२०२४.**

## "तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस अटक करण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश"

इसम नामे शिवप्रसाद कुशाल शेट्टी, रा.बी/१०५, मनिष कूम्पेक्स, कस्तुरी इस्टेट, भाईदर पुर्व याचे विरुध्द लोकांची फसवणुक करणे तसेच फसवणुक दिलेली रक्कम परत करु नये या करीता दुखापत करणे तसेच महीला अत्याचार यासारखे सन २०११ ते २०२३ या कालावधीत सलग नवघर पोलीस स्टेशन येथे ०३ गुन्हे, मिरारोड पोलीस स्टेशन येथे ०३ गुन्हे, उत्तन पोलीस स्टेशन येथे ०१ गुन्हा, नयानगर पोलीस स्टेशन येथे १ गुन्हा असे एकुण ०८ गुन्हे दाखल असुन ते न्यायप्रविष्ठ आहेत. सदर गुन्हयात अटक होवुनही त्याचे गुन्हेगारी वृत्तीत बदल झालेला नाही. त्याचे समाजविघटीत कृत्यामुळे समाजाचे व आजुबाजुच्या परीसरात राहणाऱ्या नागरीकांच्या जिवीतास तसेच मालमत्तेस धोका नाकारता येणार नाही याकरीता मा.पोलीस उप आयुक्त, परीमंडळ क्र.०१ यांचे कार्यालयीन जा.क्र.पो.उपआ.परी.-१/मिरारोड/वाचक/हद्दपार आदेश-८/१९७०/२०२४, हददपार आदेश क्र. ०८/२०२४ अन्वये दि.०९.०४.२०२४ चे आदेशा प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६,(१),(अ),(ब) प्रमाणे हद्दपार इसम नामे शिवप्रसाद कुशाल शेट्टी, वय-३४ वर्षे रा.ए विंग, रुम क्र.४०१, श्रीनाथ वंदना अपार्टमेन्ट, गोन्डन नेस्ट फेज क्र.१, भाईदर पुर्व यास ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा,मुंबई शहर, मुंबई उपनगरे या कार्यक्षेत्रातुन दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेले होते.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे यांनी कार्यक्षेत्रातील गंभीर गुन्हयातील पाहीजेत/फरारी आरोपीचे शोधा करीता आदेश दिलेले होते. दिनांक १३.०८.२०२४ रोजी सहा.पो.निरी/नितीन बेंन्द्रे, पोहवा/आजीज आसीफ मुल्ल, पोहवा/अनिल रामदास नागरे असे गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असतांना भाईदर पुर्व येथील शिवराज चेम्बरमधील सिल्व्हर क्लुड, हॉटेलचे गेट बाहेर हद्दपार इसम नामे शिवप्रसाद कुशाल शेट्टी हा उभा असलेला पथकास दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन हद्दपार इसम हा ठाणे जिल्हातुन हद्दपार असतानाही तो वरील ठिकाणी कोणतीही परवानगी न घेता आल्याने मिळुन आला त्याचे विरुध्द नवघर पो.स्टे. गुनोक्र.४५२/२०२४ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.निरीक्षक राहुल राख, पोनिरी.धनांजय पोरे,सपोनि.दत्तात्रय सरक,सपोनि.नितीन बेन्द्रे,पोउपनिरी.हितेंन्द्र विचारे, सहा.पो.उप.निरी.श्रीमंत जेधे, सहा.पो.उप.निरी.मनोहर तावरे, पोहवा.अनिल नांगरे, पोहवा.आसीफ मुल्ला, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, राजविर संधु, प्रविणराज पवार, सतिष जगताप, राजाराम काळे, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, संतोष

मदने, पोशि.अंकीत सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.




--------------0000-------------